**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 13.02.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>पिफ</u>**

पुणे फिल्म फाउंडेशन, राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, आणि मुंबईच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्यावतीनं 'शो मॅन : राज कपूर' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित तेविसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून सुरू होत आहे. आठवडाभर चालणाऱ्या या महोत्सवात विविध देशी-परदेशी सुमारे 150 चित्रपट, जागतिक स्पर्धा विभागातील 14 आणि मराठी स्पर्धा विभागातिल 7 चित्रपट दाखवले जाणार आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल अभिनेत्री शुभा खोटे आणि अभिनेते अनुपम खेर, गायिका कविता कृष्णमूर्ती यांना यंदाच्या महोत्सवात गौरवण्यात येणार आहे.

**<u>रेडिओ दिवस</u>**

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. रेडिओच्या महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणं आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी, दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. ‘रेडिओ आणि हवामान बदल’ ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे. जागतिक रेडिओ दिवसनिमित्त पुणे हॅम्स आणि टेक फोरमतर्फे आकाशवाणी पुणे केंद्रामध्ये एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अलिबागचे दिलीप बापट यांच्या डिजिटल रेडिओ प्रदर्शनाचंही आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>नदी स्वच्छता</u>**

केंद्रीय संचार ब्यूरो Worship Earth Foundation आणि पुणे महानगरपालिका, संयुक्तपणे उद्या सकाळी मुठा नदी किनारी स्वच्छता अभियान राबवणार आहे. My River My Valentine अशी या अभियानाची संकल्पना आहे. विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, कलाकार, नेहरू युवा केंद्रासह NSS चे विद्यार्थी आणि नागरिक या मोहीमेत सहभागी होणार आहेत. उद्या सकाळी साडे ७ पासून मुठा नदी किनाऱ्यावर हे अभियान राबवलं जाईल. जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**<u>पुनर्वसन</u>**

पुण्यातील साधू वासवानी पूल बांधून ५० वर्षापेक्षा अधिक काळ लोटला असून हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे. त्यामुळे तो पाडून नवीन उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय महापालिकेने  घेतला आहे. या ठिकाणाच्या कोरेगाव पार्कच्या बाजूच्या झोपड्यांचं पुर्नवसन ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयामार्फत हडपसर सर्व्हे नंबर १३२ इथं करण्यात येणार आहे.

**<u>लष्कर</u>**

लष्करात नोकरी देण्याचं आमिष दाखवून तरुणांकडून पैसे घेणाऱ्या एकाला पोलिसांनी अटक केली आहे. त्यानं नोकरीच्या आमिषानं अनेक जणांची फसवणूक केल्याचं निदर्शनाला आलं असून पुणे पोलिस आणि लष्कर गुप्तचर विभागानं ही कारवाई केली आहे .

**<u>जीबीएस रुग्ण</u>**

राज्यात जीबीएसचे आतापर्यंत २०३ रुग्ण आढळून आले असून, त्यातील १७६ रुग्णांना जीबीएसचं  निदान झाले आहे. तर राज्यभरात १०९ जीबीएस रुग्णांना उपचार करून घरी सोडण्यात आल्याचं आरोग्य विभागानं म्हटलं आहे.  पुण्यातील जीबीएस रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, पुणे महापालिका ४१, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ९४, पिंपरी-चिंचवड महापालिका २९, पुणे ग्रामीण ३१ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात इतर जिल्ह्यांत आतापर्यंत ८ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात आढळलेल्या एकूण रुग्णांपैकी ५२ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याचबरोबर २० रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. आतापर्यंत जीबीएसमुळे आठ जणांचा मृत्यू झाला आहे.

**<u>Ca दीक्षांत</u>**

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे शाखेच्या वतीनं आज दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ सनदी लेखापाल भरत फाटक आणि आर्थिक सल्लागार रचना रानडे यांच्या हस्ते 1100 स्नातकांना सनदी लेखापाल पदवी प्रदान करण्यात आली.  शिक्षण ही अविरत सुरू राहणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे सनदी लेखापाल ही पदवी हा एक टप्पा आहे, असं मानून ज्ञानाची खोली आणि अनुभवाचं संचित मिळवण्यासाठी आपल्या ज्ञानशाखेशी संबंधित विशेष प्राविण्य प्राप्त करत राहावे," असा सल्ला भरत फाटक यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

**<u>कारवाई</u>**

पुणे शहराच्या विविध भागांत आणि नदीपात्रासह टेकड्यांच्या परिसरात रात्रीच्या अंधारात राडारोडा टाकणाऱ्यांवर पुणे महापालिकेनं दंडात्मक कारवाई केली आहे. ६२९ जणांवर गेल्या वर्षभरात कारवाई करत २१ लाख २६ हजार रुपयांचा दंड महापालिकेनं वसूल केला आहे.

**<u>अनधिकृत बांधकाम</u>**

गेल्या काही दिवसांपासून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं  कुदळवाडी भागात अनधिकृत बांधकाम पडण्याची कारवाई सुरू आहे. गेल्या ५ दिवसांपासून सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान ४६५ एकर भूभागावर ही कारवाई करण्यात आली आहे.

**<u>बुद्धिबळ</u>**

पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेनं ब्लिटझ जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रथमेश शेरला आठ गुणांनी विजेता ठरला. या स्पर्धेत जवळपास १०० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. वीरेश शरणार्थी, कुशाग्र जैन, निशांत जवळकर सात गुणांसह अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर राहिले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 35 अंश तर किमान 12 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृतान्त. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**